# भारतीय ख्रिश्चन विवाह अधिनियम, 1872

# प्राथमिक

**कलम 1. कायद्याचे नांव व व्याप्ती**

हा अधिनियम भारतीय ख्रिश्चन विवाह अधिनियम 1872 म्हणून संबोधला जाईल. तो संपूर्ण भारतासाठी लागू आहे. (परंतु त्रावणकोर, कोचीन, मणीपूर आणि जम्मू व काश्मीर हा प्रदेश सोडून)

**कलम 2. 1938 च्या दुरुस्तीनुसार गाळण्यात आले.**

**कलम 3. व्याख्या**

यात इंग्लंडचे चर्च, अग्लीकन, स्कॉटलंडचे चर्च, रोमचे चर्च, रोमन कॅथलिक चर्च, भारत, अज्ञान, भारतीय ख्रिश्चन, जन्म-मृत्यू व विवाहाचे मुख्य निबंधक या शब्दांच्या व्याख्या दिलेल्या आहेत.

**भाग 1**

यथाविधी विवाह घडवून आणणा-या व्यक्ती

**कलम 4. विवाह या अधिनियमानुसार यथाविधी होतील**

व्यक्तींमधील प्रत्येक विवाह, त्यापैकी एक किंवा दोन्ही ख्रिश्चन आहे किंवा आहेत. तर यापुढील कलमातील तरतुदीनुसार यथाविधी होतील आणि असा कोणताही विवाह या तरतुदी व्यतिरिक्त यथाविधी झाला असल्यास तो अवैध होय.

**कलम 5. ज्यांच्याकडून यथाविधी विवाह घडतील त्या व्यक्ती**

भारतातील विवाह यथाविधी होतील

1) बिशपकडून धर्माधिकार मिळालेल्या व्यक्तींकडून (जर विवाह तो धर्मोपदेशक असलेल्या चर्चच्या नियम, संस्कार, समारंभ आणि रुढीप्रमाणे यथाविधी घडल्यास),

2) स्कॉटलंडच्या चर्चमधील पाद्रयाकडून (जर असा विवाह स्कॉटलंडमधील चर्चच्या नियम, संस्कार, समारंभ आणि रुढीप्रमाणे यथाविधी घडल्यास),

3) या अधिनियमानुसार विवाह यथाविधी घडविण्यासाठी परवानाप्राप्त कोणत्याही धर्मोपदेशकाकडून,

4) या अधिनियमानुसार नियुक्त केलेल्या विवाह-निबंधकाच्या उपस्थितीत किंवा त्याच्याकडून,

5) या अधिनियमानुसार भारतीय ख्रिश्चनांच्या विवाहासाठी विवाह-प्रमाणपत्रे प्रदान करण्यासाठी परवानाप्राप्त कोणत्याही व्यक्तीकडून.

**कलम-6. यथाविधी विवाह घडविण्याचा परवाना प्रदान करणे किंवा रद्द करणे**

राज्य सरकार, त्याच्या अमलातील प्रदेशांसाठी, अधिकृत राजपत्रातील अधिसूचनेद्वारा, अशा प्रदेशांतील विवाह यथाविधी घडविण्यासाठी धर्मोपदेशकांना परवाना प्रदान करील आणि अशाच अधिसूचनेद्वारे असे परवाने रद्द करील.

**कलम-7. विवाह निबंधक**

राज्यसरकार, एक किंवा अनेक ख्रिश्चनांची, नावाने किंवा तत्कालीन धारण केलेल्या पदाने, त्याच्या प्रशासनाखालील कोणत्याही जिल्ह्यासाठी विवाह निबंधकांचा विवाह निबंधक म्हणून नियुक्ती करील.

**वरिष्ठ विवाह निबंधक**

कोणत्याही जिल्ह्यात एकापेक्षा जास्त विवाह-निबंधक असल्यास, राज्य सरकार त्यापैकी एकाची वरिष्ठ विवाह-निबंधक म्हणून नियुक्ती करील.

दंडाधिकारी विवाह निबंधक केव्हा असतो?

जर जिल्ह्यात एकच विवाह निबंधक आहे आणि तो त्या जिल्ह्यातून गैरहजर किंवा आजारी किंवा त्याचे कार्यालयपद तात्पुरते रिकामे असल्यास त्या जिल्ह्याचा दंडाधिकारी अशा गैरहजेरीत, आजारपणात किंवा पद तात्पुरते रिकामे असल्यास विवाह निबंधक असेल आणि कार्य करील.

**8. भारतीय संघराज्यातील विवाह-निबंधक**

1950 च्या दुरुस्तीने वगळले आहे.

**9. भारतीय ख्रिश्चनांमधील विवाहप्रमाणपत्रे प्रदान करण्याचा परवाना व्यक्तींना देणे**

राज्य सरकार कोणत्याही ख्रिश्चन व्यक्तीला त्याच्या नावाने किंवा तत्कालीन धारण केलेल्या पदाने भारतीय ख्रिश्चनांमधील विवाहास प्रमाणपत्रे प्रदान करण्याचा अधिकार देईल.

असा कोणताही परवाना तो प्रदान करणारे प्राधिकरण रद्द ठरवू शकेल आणि राजपत्रातील अधिनियम प्रदान व रद्द करण्याचे सूचीत करण्यात येईल.

## भाग 2

## यथाविधी विवाह होण्यासाठी वेळ व स्थळ

**10 यथाविधी विवाह होण्यासाठी वेळ**

या अधिनियमाखाली यथाविधी प्रत्येक विवाह सकाळी सहा ते सायंकाळी सातच्या दरम्यान पार पडलेला असेल.

अपवाद – वरील तरतूद खालील बाबतीत लागू पडणार नाही.

1) इंग्लंडच्या चर्चमधील, विशेष परवान्याने सकाळी सहा ते सायंकाळी सात या वेळे-व्यतिरिक्त कधीही यथाविधी विवाह पार पाडल्यास परवानगी दिलेला पाद्री ज्या डायअसीस किंवा कमीसरीचा ऍंग्लीकन बिशपच्या सही व शिक्क्यांनी काम करतो किंवा

2) रोमच्या चर्चमधील पाद्री, विशेष किंवा सामान्य परवान्याने सायंकाळी सात ते सकाळी सहा या वेळात पार पाडण्यास परवानगी दिलेला पाद्री जो डायोसीस किंवा व्हिकॅरिएटचा रोमन कॅथॉलिक बिशप.

3) स्कॉटलंडच्या चर्चमधील पाद्री जो स्कॉटलंड चर्चच्या नियम, संस्कार, समारंभ आणि रुढी प्रमाणे यथाविधी विवाह पार पाडतो.

**कलम 11 यथाविधी विवाहाचे स्थळ**

इंग्लंडमधील चर्चचा पाद्री ज्या चर्चमध्ये इंग्लंडच्या चर्चमध्ये होणा-या प्रकाराने पूजा सर्वसाधारणपणे होते ती जागा सोडून अन्य ठिकाणी विवाह यथाविधी पार पाडणार नाही.

जर अशा ठिकाणापासून जवळच्या रस्त्याच्या अंतराने पाच मैलाचे आत असे चर्च नसेल तर किंवा

जर डायोसीस किंवा कमीसरीच्या ऍंग्लीकन बिशपच्या सही व शिक्क्याने तसे करण्यास त्यास विशेष परवान्याने अधिकार प्राप्त झाला आहे.

विशेष परवाना शुल्क – अशा विशेष परवान्यासाठी डायअसीसचा निबंधक, अशा बिशपने वेळोवेळी दिलेल्या अधिकारानुरुप, अधिक शुल्क आकारु शकेल.

## भाग 3

या अधिनियमाखाली दिलेल्या परवान्याप्रमाणे धर्मोपदेशकानी यथाविधी पार पाडलेले विवाह

### कलम 12 प्रस्तावित विवाहाची सूचना

या अधिनियमाखाली दिलेल्या परवान्याप्रमाणे धर्मोपदेशकानी विवाह यथाविधी पार पाडण्याचे ठरविल्यास,

प्रस्तावित विवाहातील एक व्यक्ती लेखी सूचना देऊन जी यातील पहिल्या परिशिष्टात नमूद केलेल्या नमुन्याप्रमाणे असेल, किंवा त्यासाठी, तो किंवा ती ज्यांचा प्रस्तावित विवाह यथाविधी करणारा धर्मोपदेशक त्यास, खालील गोष्टी नमूद करेल.

(अ) प्रस्तावित विवाहातील प्रत्येक व्यक्तीचे नाव, आडनाव, व्यवसाय, किंवा परिस्थिती.

(ब) प्रत्येकाचे राहण्याचे स्थळ,

(क) प्रत्येकजण तेथे राहल्याचा काळ.

(ड) विवाह यथाविधी पार पाडण्याचे चर्च किंवा खाजगी राहती जागा.

अशी तरतूद करण्यात येत आहे की, जर अशा व्यक्तींपैकी कोणीही, सूचनेत नमूद केलेल्या ठिकाणी एक महिन्यापेक्षा जास्त काळ राहिली असल्यास असे नमूद करावे की तो किंवा ती तेथे एक महिना किंवा त्यापेक्षा अधिक काळ राहिली.

### 13 अशा सूचनेची प्रसिध्दी

विवाह करण्यास इच्छुक व्यक्तीस तो एखाद्या विशिष्ट चर्चमध्ये यथाविधी व्हावा असे वाटल्यास त्या चर्चमधील पद सांभाळण्यास पात्र असलेल्या धर्मोपदेशकास अशी सूचना दिल्यास, अशा चर्चच्या कोणत्याही मुख्य भागावर ती नोटीस तो लावेल.

सूचना परत करणे किंवा हस्तांतरीत करणे. परंतु अशा चर्चमध्ये तो धर्मोपदेशक पद सांभाळण्यास पात्र नसल्यास तो त्याच्या मर्जीनुसार ज्याने ती सूचना दिली त्या व्यक्तीस परत करील किंवा दुस-या धर्मोपदेशकाकडे पाठवील जो वरीलप्रमाणे ती नोटीस लावेल.

**कलम 14. खाजगी राहत्या जागेत होणा-या प्रस्तावित विवाहाची सूचना**

जर विवाह खाजगी राहत्या जागेत यथाविधी पार पाडण्याचे ठरविण्यास, कलम 12 मध्ये नमूद केलेली सूचना धर्मोपदेशक मिळाल्यावर ती जिल्हा विवाह-निबंधकाकडे पाठवील जो त्याच्या स्वत:च्या कार्यालयातील कोणत्याही मुख्य भागावर ती लावेल.

**15. विवाहातील एक पक्षकार अज्ञान असल्यास सूचनेची प्रत विवाह-निबंधकाकडे पाठविणे**

जेव्हा विवाह करणा-या व्यक्तींमधील एक अज्ञान असेल तर प्रत्येक धर्मोपदेशक अशी सूचना मिळाल्यावर, ती मिळाल्यापासून 24 तासांचे आत कलम 13 मधील तरतुदीप्रमाणे परत न केल्यास अशा सूचनेची प्रत पोस्टाने किंवा अन्य पध्दतीने जिल्हा विवाह-निबंधकाकडे पाठवील किंवा तेथे अशा जिल्ह्यासाठी एकाहून जास्त निबंधक असल्यास वरिष्ठ विवाह-निबंधकाकडे पाठवील.

**16. सूचना मिळाल्यानंतरची कार्यपध्दती**

विवाह निबंधक किंवा वरिष्ठ विवाह निबंधक, कोणीही अशी सूचना मिळाल्यावर, त्याच्या कार्यालयातील मुख्य भागावर लावील, आणि अशा सूचनेची प्रत त्याच जिल्ह्यातील अन्य विवाह-निबंधकाकडे पाठविण्याची आहे, जे वरील निर्देशित पध्दतीने ती तशीच प्रसिध्द करतील.

**17. सूचना देऊन आणि जाहीरनामा करुन त्याचा दाखला देणे**

प्रत्येक धर्मोपदेशक, वरीलप्रमाणे कोणताही विवाह यथाविधी पार पाडण्याचे ठरविल्यानंतर, आणि अशी विवाह सूचना दिल्यानंतर आणि विवाह इच्छुक व्यक्तींपैकी एकाने यापुढे कायद्याने गरजेचे आहे त्याप्रमाणे जाहीरनामा केल्यानंतर, तशी सूचना दिल्याबद्दल आणि जाहीरनामा केल्याबद्दल स्वहस्ते दाखला देईल.

**उपकलम**

(1) धर्मोपदेशकांना अशी सूचना मिळाल्यापासून चार दिवसांचा काळ पूर्ण होत नाही तोपर्यंत असा दाखला देता येणार नाही.

(2) असा दाखला देण्याबाबत त्याच्या माहितीप्रमाणे कोणताही कायदेशीर अडसर दर्शविला जाणार नाही.

(3) दाखला देण्याबाबत अधिकृत असलेल्या कोणत्याही व्यक्तीने असा दाखला देण्यास यापुढे नमूद केलेल्या कोणत्याही पध्दतीने मनाई केलेली नाही.

**18. दाखला देण्यापूर्वी जाहीरनामा**

कलम 17 प्रमाणे देण्यात येणारा दाखला जोपर्यंत विवाह इच्छुक व्यक्तीपैकी एकजण धर्मोपदेशकापुढे व्यक्तिश: हजर राहून गंभीरपूर्वक जाहीरनामा करणार नाही तोपर्यंत देण्यात येणार नाही.

(अ) तो किंवा ती यावर विश्वास ठेवतात की, अशा विवाहास वंशीय नातेवाईकांचा किंवा स्नेह्यांचा अडसर नाही किंवा इतर कायदेशीर अडचणी नाहीत आणि जेव्हा एक किंवा दोन्ही व्यक्ती अज्ञान आहे किंवा आहेत.

(ब)कायद्यानी आवश्यक ती संमती किंवा संमत्या मिळालेल्या किंवा मिळविलेल्या आहेत किंवा भारतात राहणा-या कोणाही व्यक्तीस अशी संमती देण्याचा अधिकार नाही यापैकी जे असेल ते.

**19 पिता, पालक, किंवा आईची संमती**

कोणत्याही अज्ञान व्यक्तीचा पिता तो जीवंत असल्यास किंवा पिता मयत असल्यास अशा अज्ञान व्यक्तीचे पालक आणि जर असा पालक नसल्यास अज्ञान व्यक्तीची आई अज्ञान व्यक्तीच्या विवाहास संमती देईल.

अशी संमती देण्याचा अधिकार असलेली व्यक्ती भारतात राहत नसल्यास तो अपवाद सोडून अशा विवाहांकरिता अशा प्रकारे संमती आवश्यक आहे.

**कलम 20. दाखला देण्यास प्रतिबंध करण्याचा अधिकारी**

प्रत्येक व्यक्ती, जिची कलम 19 प्रमाणे विवाहास संमती असणे आवश्यक आहे. तिला असा दाखला देण्यापूर्वी कधीही, अशा धर्मोपदेशकास लेखी नोटीशीने त्यावर अशा अधिकृत व्यक्तीने तिच्या किंवा त्याच्या नावाने सही करुन, राहण्याचे ठिकाण आणि विवाहेच्छुक व्यक्तींपैकी कोणाशीही असलेले नाते नमूद करुन आणि ती किंवा तो कोणत्याही कारणाने वरीलप्रमाणे अधिकृत व्यक्ती आहे ते नमूद करुन, कोणत्याही धर्मोपदेशकाने दाखला देण्यास प्रतिबंध करण्याचा अधिकार आहे.

**कलम 21. सूचना प्राप्त झाल्यावर कार्यपध्दती**

अशा धर्मोपदेशकांस वरीलप्रमाणे कोणतीही सूचना मिळाल्यावर, अशा प्रतिबंधाचे कारण तपासल्याशिवाय आणि विवाहास प्रतिबंध करणा-या व्यक्तीस अशा प्रतिबंधाकरिता कोणताही कायदेशीर अधिकार नाही याबाबत समाधान झाल्याशिवाय तो त्याचा दाखला

देणार नाही आणि विवाह यथाविधी पार पाडणार नाही. (किंवा अशी सूचना देणारी व्य सूचना मागे घेत नाही तोपर्यंत)

**कलम 22. अज्ञानांच्या बाबतीत दाखला देणे**

विवाहेच्छुक व्यक्तींपैकी कोणीही अज्ञान असेल आणि कलम 19 प्रमाणे अशा विवाहास ज्या व्यक्तीची संमती आवश्यक आहे ती मिळविलेली संमती धर्मोपदेशकास समाधानकारक न वाटल्यास, असा धर्मोपदेशक, विवाहसूचना त्यास मिळाल्यापासून चौदा दिवसांचा कालावधी होईपर्यन्त असा दाखला देणार नाही.

**कलम 23. भारतीय ख्रिश्चनांना दाखला देणे**

ज्याचा विवाह होणार आहे अशा कोणत्याही भारतीय ख्रिश्चनाने धर्मोपदेशकास विवाहसूचना दिल्यानंतर किंवा कलम 17 प्रमाणे अशा धर्मोपदेशकाकडून दाखला मिळण्यासाठी अर्ज केल्यानंतर, तो धर्मोपदेशक दाखला देण्यापूर्वी असा भारतीय ख्रिश्चन अशा सूचना व दाखल्यातील आशय व त्याच्या परिणामाबाबत ज्ञात आहे याची खात्री करुन आणि तसे नसल्यास ती सूचना किंवा दाखला अशा भारतीय ख्रिश्चनास जी भाषा समजते त्या भाषेत भाषांतरित करुन देईल.

**कलम 24. दाखल्याचा नमुना**

अशा धर्मोपदेशकाने द्यावयाच्या दाखला जोडलेल्या दुस-या परिशिष्टातील नमुन्यात दिल्याप्रमाणे किंवा तशा पध्दतीचा असेल.

**कलम 25. विवाह यथाविधी**

धर्मोपदेशकानी दाखला दिल्यानंतर, त्यास योग्य वाटेल त्या पध्दतीप्रमाणे अशा प्रकारे किंवा समारंभाने दाखल्यामधील पक्षकारांत यथाविधी विवाह पार पाडण्यात यावा.

परंतु असा विवाह धर्मोपदेशकाशिवाय किमान दोन साक्षीदारांचे समक्ष यथाविधी पार पाडण्यात यावा.

**कलम 26. विवाह दोन महिन्यांत यथाविधी पार न पडल्यास दाखला अवैध ठरेल**

वरीलप्रमाणे धर्मोपदेशकाने दाखला दिलेल्या तारखेपासून दोन महिन्यांच्या आत विवाह यथाविधी पार न पडल्यास तसा दाखला आणि त्यावरील सर्व कामकाज (काही असल्यास) अवैध ठरेल.

आणि त्यानंतर कोणीही व्यक्ती तसा विवाह नवीन सूचना दिल्याशिवाय आणि त्यावर दाखला वरीलप्रमाणे दिल्याशिवाय यथाविधी पाड पडू शकणार नाही.

## भाग 4

### कलम 27. विवाह नोंदणी केव्हा करता येईल ?

भारतात यापुढे यथाविधी पार पडलेले ज्यात एक किंवा दोन्ही व्यक्ती ख्रिश्चन धर्माचे आहेत असे सर्व विवाह, भाग-5 किंवा भाग-6 प्रमाणे यथाविधी झालेल्या विवाहाव्यतिरिक्त यापुढे नमूद केलेल्या पध्दतीने नोंदणी करण्यात येतील.

### कलम 28. इंग्लंडमधील चर्चच्या पाद्रयाकडून यथाविधी झालेल्या विवाहाची नोंदणी करणेबाबत

इंग्लंडमधील चर्चचा प्रत्येक पाद्री विवाह नोंदवही ठेवेल आणि त्यात यापुढे जोडलेल्या तिस-या परिशिष्टातील नमुन्याप्रमाणे, तो या अधिनियमान्वये यथाविधी पार पडणा-या प्रत्येक विवाहाची नोंद त्यात करील.

### कलम 29. आर्चडिकन्री कडे तिमाही माहितीपत्रक पाठविणेबाबत

इंग्लंडमधील चर्चचा प्रत्येक पाद्री, प्रत्येक वर्षातून चार वेळा दोन प्रतीत, त्यावर त्याच्या सहीने ते अधिकृत करुन त्याच्याकडे ज्या जागेची आध्यात्मिक जबाबदारी आहे त्याठिकाणी यथाविधी पार पडलेल्या विवाहाच्या विवाह नोंदवहीतील नोंदी, त्यास अधिकार असलेल्या किंवा अशी जागा वसली असेल तिच्या स्थळसीमेतील आर्च डिकन्रीच्या निबंधकाकडे पाठवील.

माहितीपत्रकात समाविष्ट असलेल्या गोष्टी.

अशा तिमाही माहितीपत्रकात जानेवारीच्या पहिल्या दिवसापासून मार्चच्या एकतीस तारखेपर्यन्त; एक एप्रिल पासून तीस जून पर्यंत, एक जुलै पासून तीस सप्टेबर पर्यत, आणि एक ऑक्टोबर पासून एकतीस डिसेंबर पर्यंत प्रत्येक वर्षास, अनुक्रमे असलेल्या अशा नोंदवहीत समाविष्ट असलेल्या सर्व विवाहाच्या नोंदी समाविष्ट असतील आणि त्या वरील नमूद केलेल्या प्रत्येक तिमाहीच्या मधल्या काळात दोन आठवडे समाप्त होण्यापूर्वीच्या मुदतीत अशा प्रत्येक पाद्रयाने पाठविल्या पाहिजेत.

असा निबंधक वरीलप्रमाणे माहितीपत्रक मिळाल्यानंतर त्याची एक प्रत जन्म, मृत्यू आणि विवाहाच्या महानिबंधकाकडे पाठवील.

**कलम 30. रोममधील चर्चच्या पाद्रयाने यथाविधी पार पाडलेल्या विवाहांची नोंदणी करुन माहितीपत्रके पाठविण्याबाबत**

रोममधील चर्चच्या पाद्रयाने यथाविधी पार पाडलेला प्रत्येक विवाह नोदला पाहिजे. ती नोंद जेथे विवाह यथाविधी पार पडला त्या डायोसीस किंवा व्हिकॅरिएटच्या रोमन कॅथॉलिक बीशपने ठरवून दिलेल्या नमुन्याप्रमाणे असावी.

आणि अशी व्यक्ती तिमाही पत्रकात त्याने मागील तीन महिन्यांत नोंदलेल्या सर्व विवाहांच्या नोंदी लिहून ते जन्म, मृत्यू आणि विवाह महानिबंधकाकडे पाठवील.

**कलम 31. स्कॉटलंडमधील चर्चच्या पाद्रयाने यथाविधी पार पाडलेल्या विवाहांची नोंदणी करुन माहितीपत्रके पाठविण्याबाबत**

स्कॉटलंडमधील चर्चचा प्रत्येक पाद्री विवाह नोंदवही ठेवेल आणि त्यात यापुढे जोडलेल्या तिस-या परिशिष्टातील नमुन्याप्रमाणे तो या अधिनियमान्वये यथाविधी पार पडणा-या प्रत्येक विवाहाची नोंद त्यात करील आणि कलम 29 मध्ये नमूद केल्याप्रमाणे अशा सर्व विवाहांचे तिमाही माहितीपत्रक स्कॉटलंडमधील चर्चच्या वरिष्ठ धर्मोपदेशकांतर्फे महानिबंधक- जन्म, मृत्यू आणि विवाह यांजकडे पाठवील.

**कलम 32. काही विवाह दोन ठिकाणी नोंदणी करण्याबाबत**

बिशपांकडून धर्माधिकार दीक्षा मिळालेल्या कोणत्याही व्यक्तीने यथाविधी पार पाडलेला त्येक विवाह, परंतु जो इंग्लंडमधील चर्चचा किंवा रोममधील चर्चचा पाद्री नाही किंवा या अधिनियमान्वये विवाह यथाविधी पार पाडण्याचा परवाना दिलेला धर्मोदेशक, यथाविधी विवाह पार पाडल्यानंतर ताबडतोब, विवाह यथाविधी पार पाडणा-या व्यक्तीकडे दोन प्रतीत नोंदणी केला पाहिजे. म्हणजे यापुढे जोडलेल्या चौथ्या परिशिष्टातील नमुन्याप्रमाणे, त्याने त्यासाठी ठेवलेल्या विवाह नोंदवहीत नोंद करावी आणि दुस-या विवाह नोंदवहीस जोडलेल्या दाखल्यात स्थळप्रत म्हणून नोंद करावी.

**कलम 33. अशा विवाहांच्या नोंदवर सही करणे आणि साक्षाकित करणे**

अशा विवाहांच्या नोंदी दाखवल्यावर आणि विवाह नोंदवहीवर अशा दोन्ही ठिकाणी करुन त्यावर विवाह यथाविधी पार पाडणा-या व्यक्तीने तसेच विवाह करणा-या व्यक्तींनी सही केली पाहिजे आणि विवाह यथाविधी पार पाडणा-या व्यक्तींशिवाय त्यावेळी हजर असणा-या दोन विश्वासू साक्षीदारांनी साक्षांकित केले पाहिजे.

अशी प्रत्येक नोंद, नोंदवहीच्या सुरुवातीपासून शेवटापर्यन्त या क्रमाने होईल आणि दाखल्याचा अनुक्रमांक, विवाह नोंदवहीतील नोंदीच्या अनुक्रमांकाशी जुळणारा असेल.

**कलम 34. दाखला विवाह निबंधकाकडे पाठविणे, त्याची नक्कल करुन महानिबंधकाकडे पाठविणेबाबत**

विवाह यथाविधी पार पाडणारी व्यक्ती त्यानंतर दाखला, विवाह नोंदवहीपासून अलग करुन तो, एक महिन्याचे आत जिल्हा विवाह-निबंधकाकडे पाठवील.

तो अशा दाखल्याची नक्कल त्याने त्यासाठी ठेवण्याच्या नोंदवहीत करील आणि त्या महिन्यात त्याला मिळालेले सर्व दाखले यापुढे नमूद केल्याप्रमाणे आवश्यक असे क्रमांक घालून आणि त्यावर सही करुन किंवा नावाची प्रारंभिक अक्षरे लिहून महानिबंधक जन्म, मृत्यू व विवाह यांजकडे पाठविले पाहिजेत.

**कलम 35. दाखल्यांच्या नकला नोंद करणे व क्रमांक टाकण्याबाबत**

अशा प्रती नोंदवहीच्या सुरुवातीपासून शेवटापर्यंत अशा क्रमाने नोंदवावाव्यात आणि त्यावर दाखल्याच्या नकलेचा क्रमांक तसेच अशा नोंदवहीत अशा नकलेचा नोंद क्रमांक दर्शविणारा क्रमांक, प्रत्येक दाखला ज्या क्रमाने मिळाला त्याप्रमाणे क्रमाने विवाह-निबंधकाने क्रमांक घातला पाहिजे.

**कलम 36. निबंधकाने दाखल्यावर नोंद क्रमांक घालणे आणि ते महानिबंधकाकडे पाठविणेबाबत.**

विवाह निबंधक नोंदवहीतील नकलेच्या नोंदीचा असा शेवटचा क्रमांक दाखल्यावर लिहून त्यावर सही किंवा प्रारंभिक अक्षरे लिहून, ती प्रत्येक महिन्याच्या शेवटी महानिबंधक- जन्म, मृत्यू व विवाह यांजकडे पाठवील.

**कलम-37. कलम 5 पोटकलम 1, 2 आणि 3 मध्ये संदर्भित व्यक्तीनी भारतीय ख्रिश्चनांमध्ये झालेल्या विवाहाची नोंदणी करण्याबाबत.**

कलम 5 पोटकलम 1, 2, आणि 3 मधील संदर्भित पाद्री किंवा धर्मोपदेशक अशा कोणत्याही व्यक्तीनी भारतीय ख्रिश्चनांमधील कोणताही विवाह यथाविधी पार पाडला असल्यास, यथाविधी पार पाडणारी व्यक्ती, कलम 28 ते 36 मधील तरतूद केलेल्या पध्दतीने कामकाज न करता अन्य नोंदवहीत विवाह नोंदणी करील आणि ते दाखल होईपर्यंत सुरक्षित ठेवील किंवा अशी नोंदवही दाखल होण्यापूर्वी विवाह यथाविधी पार पडलेला जिल्हा त्याने सोडल्यास, अशा जिल्हयात त्याची कर्तव्ये बजावणा-या उत्तराधिका-यास दाखवील.

**नोंदवह्यांची देखभाल आणि विल्हेवाट**

दाखल करण्याच्या वेळी नोंदवह्यांवर ज्याचा अधिकार आहे ती व्यक्ती, जिल्ह्याच्या विवाह-निबंधकाकडे पाठवील किंवा त्या ठिकाणी एकापेक्षा जास्त विवाह-निबंधक असल्यास

वरिष्ठ विवाह निबंधकाकडे पाठवील, जो त्यानंतर त्या महानिबंधक जन्म, मृत्यू व विवाह यांचेकडे त्यांच्या कार्यालयातील दप्तराबरोबर ठेवण्यासाठी पाठवील.

## भाग 5

### विवाह-निबंधक : विवाह : यथाविधी पार पाडणे किंवा उपस्थितीत पार पाडणे.

**38. विवाह-निबंधकास प्रस्तावित विवाहाची सूचना देण्याबाबत**

जेव्हा विवाह-निबंधकाच्या उपस्थितीत किंवा विवाह-निबंधकाने यथाविधी पार पाडण्याचे ठरते तेव्हा अशा विवाहातील कोणीही एका पक्षकाराने यापुढे जोडलेल्या पहिल्या परिशिष्टातील नमुन्यात लेखी सूचना जिल्हा विवाह-निबंधकास (जेथे पक्षकार राहतात त्या जिल्ह्याचे) देतील.

किंवा जर पक्षकार भिन्न जिल्ह्यात राहत असतील तर तशी सूचना त्या प्रत्येक जिल्ह्याच्या विवाह-निबंधकास देतील.

आणि त्यात नाव आणि आडनाव, प्रत्येक पक्षकाराचा धंदा किंवा आर्थिक स्थिती, राहण्याचा पत्ता, राहण्याचा कालावधी, यथाविधी विवाह होण्याचे ठिकाण नमूद केले पाहिजे.

कोणीही पक्षकार सूचनेत नमूद केलेल्या ठिकाणी एक महिन्यापेक्षा जास्त असल्यास तो किंवा ती त्या ठिकाणी एक महिना आणि त्यापुढे राहत असल्याचे नमूद करावे.

**कलम 39. सूचनेचे प्रकटीकरण**

प्रत्येक विवाह-निबंधक अशी सूचना मिळाल्यावर त्याची प्रत त्याच्या कार्यालयाच्या मुख्य भागावर लावेल.

विवाहेच्छुक पक्षकारातील एक जण अज्ञान असल्यास, प्रत्येक विवाह-निबंधक अशा विवाहाची सूचना मिळाल्यापासून चोवीस तासांच्या आत पोस्टाने किंवा अन्य प्रकारे अशा सूचनेची प्रत त्याच जिल्ह्यातील अन्य विवाह-निबंधकांकडे (कोणी असल्यास) पाठवील व ते त्यांच्या कार्यालयातील कोणत्याही मुख्य भागावर त्याची प्रत लावतील.

**40. सूचना दप्तरी लावणे आणि प्रत विवाह सूचनावहीत नोंद करणे.**

विवाह-निबंधक अशा सर्व सूचना दप्तरी लावून त्याच्या कार्यालयातील दप्तरात ठेवेल आणि राज्यसरकारने त्याला त्यासाठी दिलेल्या विवाह सूचनावहीत अशा सर्व सूचनांची खरी नक्कल नोंद करील.

आणि विवाह सूचनावही ही सर्व वेळेत, निशुल्क, ती पाहण्याची इच्छा असणा-या सर्व व्यक्तींस पाहण्यासाठी खुली ठेवली जाईल.

**कलम 41. सूचना दिल्याचा आणि शपथ घेतल्याचा दाखला**

अशी सूचना देणारा पक्षकार, यानंतर नमूद केल्याप्रमाणे दाखला देण्याची विवाह-निबंधकास विनंती करील आणि विवाहेच्छुक पक्षकारांपैकी एकाने यानंतर नमूद केल्याप्रमाणे शपथ घेतल्यास, विवाह-निबंधक त्याच्या स्वहस्ते अशी सूचना दिल्याचा आणि शपथ घेतल्याचा दाखला देईल.

जर असा दाखला देण्यात येऊ नये याबाबत कोणतीही कायदेशीर अडचण नसल्याचे त्याचे समाधान झाल्यास असा दाखला देण्यास या अधिनियमाने त्यासाठी अधिकृत असलेल्या कोणीही व्यक्तीने यापुढे नमूद केलेल्या पध्दतीने मनाई केलेली नसल्यास अशी सूचना मिळाल्यापासून चार दिवसांचा काळ संपला असल्यास आणि यापुढे अशा शपथेवरुन विवाहेच्छुक पक्षकारांपैकी एकजण अज्ञान असल्याचे दिसून आल्यास, अशी सूचना मिळाल्यापासून चौदा दिवसांचा काळ संपला असल्यास तसा दाखला दिला जाईल.

**कलम 42. दाखला देण्यापूर्वी शपथ**

कलम 41 मध्ये नमूद केलेला दाखला, विवाहेच्छुक पक्षकारांपैकी एक जण विवाह-निबंधकापुढे प्रत्यक्ष हजर राहून खालीलप्रमाणे शपथ घेणार नाही तोपर्यंत कोणत्याही विवाह-निबंधकाने देऊ नये.

अ) तो किंवा ती यावर विश्वास ठेवतात की, अशा विवाहास वंशीय नातेवाईकांचा किंवा स्नेह्यांचा अडसर नाही किंवा इतर कायदेशीर अडचणी नाहीत.

ब) दोन्ही पक्षकारांचे किंवा शपथ घेणा-या पक्षकाराचे त्याचे किंवा तिचे नेहमीचे राहण्याचे ठिकाण विवाह-निबंधकाच्या जिल्ह्यात आहे आणि जर एक पक्षकार किंवा दोन्ही पक्षकार अज्ञान असल्यास,

क) कायद्याने विवाहास आवश्यक असलेली संमती किंवा संमत्या घेतल्या आहेत किंवा अशी संमती देण्यास अधिकृत असलेली व्यक्ती भारतातील रहिवासी नाही.

**43. चौदा दिवसांपूर्वी दाखला मिळण्याचा आदेश मिळण्यासाठी उच्च न्यायालयात अर्ज.**

विवाहेच्छुक व्यक्तींपैकी एक पक्षकार अज्ञान असल्यास आणि असे दोन्ही पक्षकार कलकत्ता, मद्रास आणि मुंबई यांपैकी कोणत्याही शहरात राहत असल्यास आणि वरीलप्रमाणे सूचनेची नोंद झाल्यापासून चौदा दिवसांचे आत विवाह करण्यास उत्सुक

असल्यास ते उच्च न्यायालयातील न्यायाधीशाकडे ज्या विवाह-निबंधकाकडे विवाह सूचना दिलेली आहे त्यास कलम 41 प्रमाणे चौदा दिवस होण्यापूर्वी दाखला देण्याचा हुकूम करण्याबाबत अर्ज करता येईल.

**अर्जावर हुकूम** : समाधानकारक कारण दाखवून न्यायाधीश त्याच्या मर्जीने विवाह निबंधकास असा हुकूम करुन आदेश देईल की, आवश्यक असलेल्या चौदा दिवसांपूर्वीच आदेशात नमूद केलेल्या तारखेस दाखला देण्यात यावा.

असा विवाह-निबंधक, असा आदेश मिळाल्यावर त्याप्रमाणे देण्यात येणारा दाखला देईल.

### कलम 44. पिता किंवा पालक यांची संमती

कलम 19 मधील तरतुदी या भागातील प्रत्येक विवाहास, ज्यामधील पक्षकारांपैकी एकजण अज्ञान असल्यास लागू होतील.

**दाखला देण्यासाठी हरकत घेणे :** कोणत्याही व्यक्तीची संमती अशा विवाहास गरजेची असल्यास ती व्यक्ती विवाह-निबंधकाने दाखला देण्यासाठी, दाखला देण्यापूर्वी कधीही विवाह सूचनावहीत केलेल्या विवाह सूचनेपुढे लेखी आणि त्यावर सही करुन तिची किंवा त्याची आद्याक्षरांसह आणि राहण्याच्या ठिकाणाचा पत्ता लिहून आणि कोणत्याही पक्षकाराशी असलेले नाते लिहून व कोणत्या कारणाने तो किंवा ती हरकत घेण्यास अधिकृत आहे हे दर्शवून हरकत नोंदवेल.

**हरकतीचा परिणाम :-** अशी हरकत नोंदविल्यावर विवाह-निबंधकाने हरकतीचे कारण तपासून आणि अशा विवाहाकरिता दाखला देण्यास हरकतीने अडथळा येणार नाही याबाबत समाधान झाल्यास किंवा ज्या व्यक्तीने हरकत नोंदवली त्याने हरकत मागे घेईपर्यंत दाखला दिला जाणार नाही.

### कलम 45. ज्या व्यक्तींची संमती गरजेची आहे ती व्यक्ती वेडी असल्यास किंवा संमती अकारण न दिल्यास अर्ज

कोणतीही व्यक्ती जिची संमती या भागातील तरतुदीप्रमाणे विवाहास गरजेची आहे ती असंतुलित मनाची असल्यास, किंवा अशी कोणतीही व्यक्ती योग्य कारणाशिवाय संमती देत नसल्यास विवाहेच्छुक पक्षकार ज्याची संमती गरजेची आहे ती व्यक्ती कलकत्ता, मद्रास आणि मुंबई या शहरांत राहत असल्यास उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांकडे किंवा अशा शहरात ती राहत नसल्यास जिल्हा न्यायाधीशांकडे अर्ज करेल,

**अर्जावरील कारवाई--** उच्च न्यायालयाचा किंवा जिल्हा न्यायालयाचा न्यायाधीश अर्जातील आरोपाची तपासणी सारांशाने करेल आणि जर तपासणीत असा विवाह योग्य वाटला तर तो उच्च न्यायालयाचा किंवा जिल्हा न्यायालयाचा न्यायाधीश तो विवाह योग्य असल्याबाबत जाहीर करेल.

असे जाहिरीकरण परिणामकारक असेल की ज्यांची संमती विवाहास गरजेची होती, ती दिली होती असे धरण्यात येईल.

आणि जर त्याने विवाह-निबंधकाने दाखला देण्यास मनाई केली असल्यास तो दाखला देण्यात येईल आणि दाखला देण्यास मनाई केली नव्हती अशा त-हेने ते प्रकरण धरले जाईल.

**कलम 46. विवाह निबंधकाने दाखला नाकारल्यास अर्ज करण्याबात**

या भागात नमूद केलेला दाखला देण्यास विवाह-निबंधकाने तक्रार दिल्यास, विवाहेच्छुक पक्षकारांपैकी कोणीही व्यक्ती अशा निबंधकाचा जिल्हा कलकत्ता, मद्रास आणि मुंबई या शहरांच्या स्थळसीमेत असल्यास उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांकडे किंवा जर असा जिल्हा वरील शहरात नसेल तर जिल्हा न्यायाधीशांकडे अर्ज करेल.

**अर्जावरील कारवाई--** उच्च न्यायालयाचा किंवा जिल्हा न्यायालयाचा न्यायाधीश अर्जातील आरोपांची सारांशाने तपासणी करेल आणि त्यावर निकाल देईल.

उच्च न्यायालयाच्या किंवा जिल्हा न्यायालयाच्या न्यायाधीशाचा असा निर्णय अंतिम असेल आणि दाखला देण्यासाठी मूळ अर्ज केलेला विवाह-निबंधक त्याप्रमाणे पुढील कारवाई करील.

**कलम 47. 1950 च्या सुधारणा कायद्याने वगळण्यात आले आहे**

**कलम 48. मनाई करणा-या व्यक्तीच्या अधिकाराबाबत निबंधकाने संशय घेतल्यास अर्ज**

कलम 44 मधील तरतुदीनुसार वागत असताना विवाह-निबंधक, दाखला देण्यास मनाई करणारी व्यक्ती तसे करण्यास कायद्याने अधिकृत आहे याबाबत समाधान न झाल्यास, असा विवाह-निबंधक त्याचा जिल्हा कलकत्ता, मद्रास आणि मुंबई या शहरात असल्यास उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांकडे किंवा असा जिल्हा वरील शहरात नसल्यास जिल्हा न्यायाधीशाकडे अर्ज करेल.

**अर्जावरील कारवाई :** अशा अर्जात प्रकरणाच्या सर्व घटना नमूद केलेल्या असतील आणि त्याबाबत न्यायालयाने देण्याचा आदेश व निकालाबाबत विनंती असेल, उच्च न्यायालयाचा

किंवा जिल्हा न्यायालयाचा न्यायाधीश अर्जातील तक्रारी आणि घटनांची तपासणी करील आणि तपासणीत असा दाखला देण्यास मनाई करणारी व्यक्ती तसे करण्यास कायद्याने अधिकृत नाही असे आढळून आल्यास दाखला देण्यास मनाई करणारी व्यक्ती तसे करण्यास कायद्याने अधिकृत नाही असे जाहीर करेल.

आणि त्यानंतर तसा दाखला देण्यात येईल आणि त्या विवाहाच्या संबंधात असलेले प्रकरण दाखला देण्यास मनाई न केल्यासारखे धरले जाईल.

**कलम 49. दाखला देण्यास खोडसाळ हरकत घेतल्यास जबाबदारी**

या भागातील तरतूदीप्रमाणे कोणत्याही व्यक्तीने विवाह-निबंधकाकडे नोंदविलेली कोणताही दाखला देण्याविरुध्द असलेली, ज्या कारणांमुळे असेल ती कारणे कलम 44 नुसार विवाह-निबंधकांनी, किंवा कलम 45 किंवा 46 नुसार उच्च न्यायालय किंवा जिल्हा न्यायालयाच्या न्यायाधीशांनी खोडसाळ असल्याचे घोषित केल्यास आणि त्यामुळे दाखला देण्यास अडचण येणार नाही अशी असल्यास त्या संदर्भात सर्व कारवायांच्या खर्चासाठी आणि नुकसानीसाठी जबाबदार राहील आणि ज्याच्या विवाहाविरुध्द अशी हरकत नोंदविली होती त्याने दावा दाखल करुन त्याची वसुली करावी.

**कलम 50. दाखल्याचा नमुना.**

कलम 41 प्रमाणे विवाह-निबंधकांनी द्यावयाचा दाखला यापुढील परिशिष्ट दोन मध्ये नमूद केलेल्या नमुन्याप्रमाणे असेल किंवा तसा परिणामाचा असेल आणि राज्य सरकार प्रत्येक विवाह-निबंधकास पुरेशा संख्येत दाखल्याचे नमुने देईल.

**कलम 51. दाखला दिल्यानंतर विवाह यथाविधी पार पाडण्याबाबत**

विवाह-निबंधकाने दाखला दिल्यानंतर किंवा या अधिनियमाने भिन्न जिल्ह्यातील विवाह-निबंधकास सूचना द्यावी लागल्यास अशा जिल्ह्यांच्या विवाह निबंधकांनी दाखले दिल्यानंतर अशा दाखल्यात किंवा दाखल्यांत वर्णन केलेल्या पक्षकारांमध्ये विवाह होण्यास कोणतीही कायदेशीर अडचण नसल्यास, त्यांना योग्य वाटेल त्या पध्दतीने आणि समारंभाने त्यांचा विवाह पार पाडण्यात यावा. परंतु असा प्रत्येक विवाह कोणत्याही विवाह निबंधकाच्या उपस्थितीत पार पाडण्यात यावा आणि विवाह-निबंधकाचे व्यतिरिक्त दोन खात्रीचे साक्षीदार असावेत आणि समारंभाच्या कोणत्याही भागात प्रत्येक पक्षकार खालीलप्रमाणे जाहीर करतील किंवा तशा आशयाचे जाहीर करतील.

‘‘मी गंभीरपणे, जाहीर करतो की, मला अशी कोणतीही कायदेशीर अडचण ज्ञात नाही की मला अब, कड च्या विवाहास सहभागी होता येणार नाही.’’

प्रत्येक पक्षकार दुस-यास खालीलप्रमाणे किंवा तशा आशयाचे म्हणेल.

मी, या व्यक्तींना साक्षीदार म्हणून हजर राहण्यासाठी बोलावले की, मी अब, कड चा कायदेशीर पत्नी (किंवा पती) म्हणून स्वीकार करत आहे.

**कलम 52. विवाह सूचनेनंतर दोन महिन्यांत झाला नाही तर नवीन सूचना आवश्यक असल्याबाबत.**

कलम 40 प्रमाणे आवश्यक ती सूचना विवाह निबंधकाने नोंद केल्यानंतर जर विवाह दोन महिन्यात पार पडला नाही तर त्यानंतर दिलेली सूचना आणि दाखला आणि त्यानंतरची सर्व कार्यवाही अवैध ठरेल. वर नमूद केलेल्या वेळी व त्या पध्दतीने नवीन सूचना दिल्याशिवाय आणि नोंद झाल्याशिवाय व दाखला दिल्याशिवाय कोणतीही व्यक्ती विवाह पार पाडू शकणार नाही किंवा विवाह-निबंधक त्यांची नोंद करु शकणार नाही.

**कलम 53 नोंद करण्याचा तपशील विवाह निबंधकाने विचारण्याबाबत.**

या भागातील तरतूदीप्रमाणे विवाह यथाविधी निबंधकासमोर पार पडला तर अशा विवाहास स्पर्श करणा-या, नोंदणी करण्याच्या कित्येक तपशीलवार बाबी विवाह करणा-या पक्षकारांना विवाह निबंधक विचारु शकेल.

**कलम 54. भाग-5 प्रमाणे यथाविधी पार पाडलेल्या विवाहाची नोंदणी**

या भागाप्रमाणे यथाविधी विवाह पार पाडल्यानंतर विवाहप्रसंगी हजर असणारा विवाह-निबंधक विवाहाची नोंद दोन प्रतीत करील. म्हणजेच एक विवाह नोंदणी वहीत, यापुढे जोडलेल्या परिशिष्ट-चार मधील नमुन्याप्रमाणे आणि दुसरी विवाह नोंदणी वहीत जोडलेल्या दाखल्यात स्थळप्रत म्हणून.

असा विवाह दोन ठिकाणी नोंद झाल्यावर म्हणजे दाखला आणि विवाह नोंदवहीत, ज्याच्यापुढे विवाह यथाविधी पार पडला त्या व्यक्तीने सही केली पाहिजे आणि अशा विवाहास हजर असणा-या विवाह-निबंधकाने सही केली पाहिजे. त्याने विवाह यथाविधी पार पाडलेला असो किंवा नसो, विवाह करणा-यांनीसुध्दा सह्या केल्या पाहिजेत आणि विवाह-निबंधका व्यतिरिक्त आणि यथाविधी पार पाडणा-या व्यक्ती व्यतिरिक्त दोन खात्रीच्या साक्षीदारांनी त्यावर सह्या केल्या पाहिजेत.

अशी प्रत्येक नोंदवहीच्या सुरुवातीपासून शेवटपर्यंत अशा क्रमाने केली पाहिजे आणि दाखल्याचा क्रमांक आणि विवाह नोंदवहीतील नोंदीचा क्रमांक सारखाच असला पाहिजे.

**कलम 55. प्रतिमहा दाखले महानिबंधकांकडे पाठविण्याबाबत**

विवाह-निबंधक त्यानंतर दाखले, विवाह नोंदवहीतून विभक्त करुन ते प्रति महिन्याचे शेवटी महानिबंधक जन्म, मृत्यू व विवाह यांचेकडे पाठवील.

**नोंदणी वह्यांचा ताबा :**विवाह-निबंधक अशा नोंदणी वह्या दप्तरी देईपर्यन्त सुरक्षित ठेवेल आणि त्यानंतर महानिबंधक जन्म, मृत्यू व विवाह यांचेकडे त्यांनी त्यांच्या कार्यालयातील दप्तरासह ठेवण्यासाठी पाठवेल.

**कलम 56. सुधारणा कायदा 1950 ने वगळण्यात आले.**

**कलम 57. सूचना आणि दाखला यामधील मजकूर भारतीय ख्रिश्चनांना समजल्याची निबंधकांनी खात्री करण्याबाबत.**

विवाह करणारा भारतीय ख्रिश्चन विवाह सूचना देतो किंवा विवाह-निबंधकाकडे दाखल्यासाठी अर्ज करतो त्यावेळी विवाह-निबंधकाने अशा भारतीय ख्रिश्चनास इंग्लिश भाषा समजते याबाबत खात्री करुन घेतली पाहिजे आणि ती समजत नसल्यास विवाह-निबंधक अशा भारतीय ख्रिश्चनास समजणा-या भाषेत अशी सूचना किंवा दाखला किंवा दोन्ही भाषांतरीत करील किंवा विवाह-निबंधक अन्यथा असा भारतीय ख्रिश्चन अशा सूचना व दाखल्यातील आशय व त्याच्या परिणामाबाबत ज्ञात आहे याची खात्री करील.

**कलम 58.**

या भागातील तरतूदीप्रमाणे कोणताही भारतीय ख्रिश्चन विवाह करतो त्यावेळी यथाविधी विवाह पार पाडणारी व्यक्ती अशा भारतीय ख्रिश्चनास इंग्लिश भाषा समजते याची खात्री करील आणि समजत नसल्यास, विवाह यथाविधी पार पाडणारी व्यक्ती विवाह यथाविधी पार पाडत असताना अशा भारतीय ख्रिश्चनास समजेल अशा भाषेत भाषांतरीत करील आणि या अधिनियमातील तरतुदीप्रमाणे अशा विवाहाच्या वेळी जाहीरनामा करील.

**कलम 59. भारतीय ख्रिश्चनांमधील विवाहांची नोंदणी**

कलम 37 मधील (जोवर लागू आहेत तोवर) नमूद केलेल्या तरतूदींशी मिळत्याजुळत्या पध्दतीने भारतीय ख्रिश्चनांमधील विवाहांची नोंदणी करण्यात यावी. आणखी अन्य प्रकारे करता येणार नाही.

## भाग 6

**कलम 60. भारतीय ख्रिश्चनांचे विवाह कोणत्या शर्तीवर प्रमाणित होतील ?**

भारतीय ख्रिश्चनांमधील प्रत्येक विवाहात दाखल्यासाठी अर्ज केल्यास, भाग 3 मधील आवश्यक त्या प्राथमिक सूचनेशिवाय, या भागातील तरतुदीने खालील शर्तींची पूर्तता झाली असल्यास विवाह प्रमाणित करण्यात येईल अन्यथा नाही.

1) विवाह करणा-या पुरुषाचे वय एकवीस पेक्षा कमी नसल्यास आणि विवाह करणा-या स्त्रीचे वय अठरापेक्षा कमी नसल्यास,

2) विवाह करणा-या कोणाही व्यक्तीची पत्नी किंवा पती हयात नसल्यास,

3) कलम-9 प्रमाणे परवाना मिळालेल्या व्यक्तींच्या उपस्थितीत आणि अशा व्यक्तींच्या व्यतिरिक्त कमीत कमी दोन खात्रीशीर साक्षीदारांचे समक्ष प्रत्येक पक्षकाराने खालीलप्रमाणे दुस-या व्यक्तीस म्हटल्यास,

'मी या व्यक्तींना साक्षीदार म्हणून हजर राहण्यासाठी बोलावले की मी अब, सर्व शक्तिमान परमेश्वराच्या समक्ष आणि परमेश्वर येशू ख्रिस्ताच्या नावाने कड चा कायदेशीर पत्नी किंवा पती म्हणून स्वीकार करीत आहे' किंवा अशा आशयाचे.

जर विवाह करणा-या पक्षकारातील कोणाही पक्षकाराचे- त्याचे किंवा तिचे अठरा वर्षे वय पूर्ण नसल्यास, जर कलम 19 मध्ये नमूद केल्याप्रमाणे तशी संमती प्रस्तावित विवाहास दिली नसल्यास किंवा जर अशी संमती देण्यास कोणतीही अधिकृत व्यक्ती हयात नाही असे आढळल्यास या भागातील तरतूदीनुसार कोणताही विवाह प्रमाणित करता येणार नाही.

**कलम 61. दाखला प्रदान करण्याबाबत**

या भागातील तरतूदीप्रमाणे यथाविधी पार पडलेल्या विवाहाचे संदर्भात, कलम 60 मध्ये तरतूद केलेल्या शर्तीची पूर्तता झाल्यास, वरीलप्रमाणे परवानाधारक व्यक्ती, जिच्या समक्ष असा जाहीरनामा दिलेला आहे ती, अशा विवाहाच्या पक्षकारामधील कोणत्याही व्यक्तीने अर्ज केल्यास आणि त्यावर चार आणे फी दिल्यास विवाहाचा दाखला प्रदान करील.

असा दाखला त्या परवानाधारक व्यक्तीने सही केला पाहिजे आणि असा विवाह पार पडल्याचा अंतिम पुरावा म्हणून विवाह वैधतेशी स्पर्श करणा-या कोणत्याही दाव्यात वापरता येईल.

**कलम 62. नोंदवही ठेवणे आणि त्यातील उतारा महानिबंधकाकडे पाठविणे**

कलम 9 प्रमाणे परवानाधारक प्रत्येक व्यक्ती विवाह झालेल्या जिल्ह्यातील किंवा राज्यातील सामान्यत: वापरत असणा-या प्रादेशिक भाषेत किंवा इंग्लिश भाषेत आणि त्यास परवाना दिलेल्या राज्य सरकारने वेळोवेळी नेमून दिलेल्या नमुन्यात, त्याच्या हजेरीत या भागातील तरतुदीप्रमाणे यथाविधी पार पाडलेल्या सर्व विवाहांची नोंदवही ठेवेल आणि अशा राज्य सरकारच्या प्रशासनाखाली असलेल्या असलेल्या प्रदेशाच्या महानिबंधक, जन्म, मृत्यू व विवाह यांचे कार्यालयात, अशा नमुन्यात आणि अशा मध्यंतरीच्या काळासाठी सरकारने नेमून दिल्याप्रमाणे, सत्य आणि योग्य प्रकारे अधिकृत केलेले, अशा काळासाठी सर्व नोंदी केलेल्या त्याच्या नोंदवहीचे उतारे पाठवेल.

**कलम 63. नोंदवही आणि नोंदीच्या प्रतींचा शोधतपास**

या अधिनियमानुसार विवाह दाखला प्रदान करण्यासाठी परवाना प्राप्त आणि कलम 62 प्रमाणे विवाह नोंदवही ठेवणारी प्रत्येक व्यक्ती, सर्व यथायोग्य वेळी अशा नोंदवह्यांचा शोध तपास घेण्यास परवानगी देईल आणि योग्य शुल्क दिल्यास त्यातील कोणत्याही नोंदीची प्रत त्याच्या स्वहस्ते प्रमाणित करुन देईल.

**कलम 64. भारतीय ख्रिश्चनांचे भाग 1 व भाग 3 प्रमाणे झालेले विवाह नोंदविल्याच्या वह्या**

नोंदवह्याचा नमुना, त्यातील उतारे पाठवणे, त्यातील शोधतपास घेण्यास परवानगी देणे आणि त्यातील नोंदींच्या प्रती देणे याबाबतच्या कलम 62 व 63 मधील तरतुदी, जरुर ते फेरफार करुन कलम 37 नुसार ठेवण्याच्या वह्यांसाठी लागू होतील.

**कलम 65. रोमन कॅथलिक्सना भाग 6 लागू नाही**

या अधिनियमातील हा भाग, कलम 64 मध्ये, कलम 62 व 63 चा असलेला संदर्भ सोडून, रोमन कॅथलिक्स मधील विवाहांना लागू होणार नाही. परंतु यातील कोणत्याही तरतूदीमुळे, भाग-5 अधिनियम 1864 चा 25 मधील तरतुदीप्रमाणे 23/02/1865 पूर्वीचा रोमन कॅथलिक्समध्ये झालेला कोणताही विवाह अवैध ठरणार नाही.

## भाग 7

| कलमे | गुन्हा | शिक्षा |
|---|---|---|
| **66.** | विवाहासाठी खोटी शपथ, जाहीरनामा, सूचना किंवा दाखला देणे **IPC** कलम 193 | सात वर्षापर्यंत तुरुंगवास आणि न्यायालयाच्या मर्जीनुसार दंडासहित |
| **67.** | बनावट नाव धारण करुन विवाह निबंधकास दाखला देण्याची मनाई करणे. **IPC** कलम 205 | तीन वर्षापर्यंत तुरुंगवास किंवा दंड किंवा दोन्ही |
| **68.** | योग्य अधिकाराशिवाय विवाह पार पाडणे | दहा वर्षापर्यंत तुरुंगवास ज्यात सात वर्षापेक्षा कमी मुदत नसलेली काळ्यापाण्याची शिक्षा आणि दंड |
| **69.** | योग्य वेळेव्यतिरिक्त किंवा साक्षीदारांशिवाय विवाह यथाविधी पार पाडणे | तीन वर्षापर्यंत तुरुंगवास आणि दंड |
| **70.** | अज्ञानाबरोबर विवाह विनासूचना किंवा सूचनेनंतर चौदा दिवसांचे आत यथाविधी पार पाडणे | तीन वर्षापर्यंत तुरुंगवास आणि दंड |
| **71.** | सूचना जाहीर न करता दाखला देणे किंवा विवाह करणे. | पाच वर्षापर्यंत तुरुंगवास आणि दंड |
| **72.** | सूचनाकाल समाप्तीनंतर दाखला देणे किंवा अज्ञानाच्या बाबतीत सूचनेनंतर चौदा दिवसांचे आत किंवा अधिकृत मनाई असून दाखला देणे **IPC** कलम 166 | एक वर्षापर्यंत तुरुंगवास दंड किंवा दोन्ही |
| **73.** | विवाहास अधिकृत व्यक्तीने मनाई करुनसुध्दा विवाह यथाविधी पार पाडणे. | चार वर्षापर्यंत तुरुंगवास आणि दंड. |
| **74.** | विनापरवाना व्यक्तीने परवानाधारक व्यक्ती असल्याचे भासवून दाखला प्रदान करणे. | रुपये शंभर रकमेपर्यन्त दंड. |
| **75.** | नोंदणीवह्या नाश करणे किंवा खोटे फेरफार करणे | सात वर्षापर्यंत तुरुंगवास आणि दंड. |

**कलम 76. या अधिनियमानुसार दाखल केलेल्या खटल्याची सुनावणीची मुदत**

या अधिनियमानुसार शिक्षेस पात्र असलेल्या गुन्ह्यासाठी दाखल खटल्याची सुनावणी गुन्हा घडल्यानंतर दोन वर्षाच्या आत सुरु व्हावी.

## संकीर्ण

**कलम 77. या अधिनियमातील तरतूदीप्रमाणे झालेल्या विवाहाच्या बाबतीत कोणत्या गोष्टी सिध्द कराव्या लागत नाहीत?**

या अधिनियमाच्या कलम 4 आणि 5 मधील तरतूदींप्रमाणे यथाविधी पार पडलेल्या कोणत्याही विवाहाच्या बाबतीत खालील गोष्टींपैकी कोणत्याही बाबीत केवळ अनियमितता आहे या कारणाने तो अवैध ठरणार नाही.

1) विवाहित व्यक्तींच्या राहण्याच्या ठिकाणाबाबतीत केलेले कोणतेही विधान किंवा ज्याची संमती अशा विवाहासाठी कायद्याने आवश्यक आहे त्या कोणत्याही व्यक्तीच्या संमतीबाबत केलेले कोणतेही विधान

2) विवाहसूचना,

3) दाखला किंवा त्याचे भाषांतर,

4) विवाह यथाविधी पार पडल्याची वेळ व स्थळ,

5) विवाहनोंदणी.

**कलम 78. चुकांची दुरुस्ती**

कोणताही विवाह नोंदणीचे कर्तव्य, अधिकार असलेली प्रत्येक व्यक्ती जिला अशा कोणत्याही नोंदीच्या नमुन्यातील किंवा मजकुरातील चूक लक्षात आल्यास, ती लक्षात आल्यापासून एक महिन्याच्या कालावधीच्या आत, विवाहित व्यक्तींच्या समक्ष, किंवा त्यांचा मृत्यू झाला असल्यास किंवा गैरहजर असल्यास दोन खात्रीच्या साक्षीदारांच्या समक्ष समासातील जागेत चूक दुरुस्तीची नोंद करील, मूळ नोंदीत कोणताही फेरबदल न करता समासातील नोंदीवर सही करील आणि अशा दुरुस्तीची तारीख लिहील आणि ती व्यक्ती नोंदीच्या दाखल्यावर अशीच समासातील नोंद करील.

या कलमाखाली केलेली प्रत्येक नोंद ज्यांच्या समक्षतेत झाली त्या साक्षीदारांनी सह्या केल्या पाहिजेत.

आणि जर असा दाखला महानिबंधक जन्म, मृत्यू व विवाह यांना यापूर्वीच पाठविला असल्यास, ती व्यक्ती दुसरा दाखला तशाच मूळ चुकीच्या नोंदीसह तक्रार करुन आणि त्याच्या समासात दुरुस्ती करुन तो पाठवील.

**कलम 79. नोंदीचा शोधतपास आणि प्रती**

या अधिनियमाप्रमाणे यथाविधी विवाह पार पाडणा-या प्रत्येक व्यक्तींची नोंद करणे यामुळे आवश्यक आहे, आणि प्रत्येक विवाह-निबंधक किंवा महानिबंधक, जन्म, मृत्यू व विवाह ज्याकडे कोणत्याही विवाह नोंदवहीचा किंवा कोणत्याही दाखल्याचा किंवा दोन प्रतीत किंवा दाखल्याच्या प्रतीचा या अधिनियमानुसार ताबा आहे, योग्य ते शुल्क आकारुन, सर्व योग्य कार्यालयीन वेळेत अशा नोंदवह्यांचा किंवा अशा दाखल्यांचा किंवा दोन प्रतींचा शोधतपास घेण्यास परवानगी देईल आणि त्यांचा कोणत्याही नोंदीची प्रत स्वहस्ते देईल.

**कलम 80. विवाह नोंदवहीतील नोंदीची प्रमाणित प्रत वगैरे पुरावा म्हणून वापरता येईल.**

**कलम 81. काही विवाहांचे दाखले केंद्र सरकारकडे पाठविण्याबाबत.**

सरकारचे विवाह दाखले पुरावा म्हणून इंग्लंडला पाठविण्याची इच्छा झाल्यास महानिबंधक जन्म, मृत्यू व विवाह, ते विवाह दाखले त्यावर त्याची सही करुन केंद्र सरकारकडे पाठवील.

**कलम 82. राज्य सरकारने याबाबतीत निर्धारीत शुल्क वेळोवेळी आकारण्याबाबत आहे.**

**कलम 83. राज्य सरकारला अधिनियमाद्वारे वेळोवेळी नियम करण्याचा अधिकार आहे.**

**कलम 84. सुधारण कायदा 1950 ने वगळण्यात आले.**

**कलम 85. जिल्हा न्यायाधीश जाहीर करण्याचा अधिकार.**

**कलम 86. सुधारणा कायदा 1950 ने वगळण्यात आले.**

**कलम 87. परराष्ट्र वकिलातीतील व्यक्तींनी पार पाडलेल्या विवाहासाठी हा अधिनियम लागू नाही.**

**कलम 88. प्रतिबंधित नातेसंबंधातील विवाह बेकायदेशीर**

कोणताही विवाह ज्यामुळे त्यातील कोणत्याही पक्षकारास लागू असलेला वैयक्तिक कायदा त्याच्या किंवा तिच्या विवाहास मनाई करतो तो या अधिनियमामुळे कायदेशीर ठरणार नाही.